VOL- VIII ISSUE- I JANUARY 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# भारतातील अनुसुचित जमातीच्या लोकसंख्येचा एक भौगोलिक अभ्यास

**सहा.प्रा.शहाजी गंगाराम मरशिवणे**
भूगोल विभाग,
कै.बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय,
उदगीर जि.लातूर

**प्रास्ताविक :**

लोकसंख्या भुगोल ही एक मानवी भुगोलाची महत्वाची शाखा आहे. लोकसंख्या भुगोलात मानवी लोकसंख्या शास्त्रीय घटक, धर्म, वंश, जाती आणि विविध प्रकारच्या जमातीचा अभ्यास केला जातो.

जगात २६ कोटीपेक्षा जास्त मुळ रहिवासी किंवा स्थानिक जमातीच्या लोकांची संख्या आहे. जगातील ७० देशात मिळून एकुण लोकसंख्येच्या ४ टक्के इतकी आदीम जमातीची लोकसंख्या आहे. यापैकी बऱ्याच देशात हे मुळ रहिवासी किंवा आदिम जमाती आज अल्पसंख्यांक ठरल्या आहेत. भारतात सन २०११ सालच्या जनगणनेनुसार भारतातील अनुसूचित जमातीची एकुण लोकसंख्या १०४.१ दशलक्ष म्हणजेच एकुण लोकसंख्येच्या ८.६० टक्के एवढी आहे.

**➢ अभ्यासक्षेत्र :**

भारत उत्तरपुर्व (ईशान्य) गोलार्धात दक्षिण आशिया खंडात स्थित आहे. भारताचा अक्षवृत्तीय विस्तार ८°४'२५'' उत्तर ते ३७°६' ५३'' उत्तर अक्षवृत्तादरम्यान पसरलेला असून रेखावृत्तीय विस्तार ६८°७' ३३'' पूर्व ते ९७°२५' ४७'' पूर्व रेखावृत्तादरम्यान पसरलेला आहे. भारताच्या मध्यातून २३°३०' उत्तर अक्षवृत्त म्हणजेच कर्कवृत्त गेले आहे. जगातील एकुण क्षेत्रफळाच्या २.४६ टक्के एवढा प्रदेश भारताने व्यापला असून क्षेत्रफळानुसार भारताचा सातवा क्रमांक लागतो.

**➢ उद्देश :**

१. भारतातील अनुसुचित जमातींचे प्रादेशिक वितरणाचा आढावा घेणे.
२. भारतातील अनुसुचित जमातीच्या लोकसंख्येचा आढावा घेऊन संख्यात्मक विश्लेषण करणे.
३. भारतातील अनुसुचित जमातीच्या लोकसंख्येचा राज्यानूसार वितरणाचा आढावा घेऊन संख्यात्मक विश्लेषण करणे.

**➢ महिती संकलनाचे स्त्रोत व अभ्यास पध्दती :**

भारतातील अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येच्या विश्लेषणासाठी दुय्यम आकडेवारीचा आधार घेतला असुन द्वितीयक सामुग्रीमध्ये भारत सरकारद्वारा २०११ साली तयार करण्यात आलेल्या जनगणना अहवालाचा आधार घेण्यात आलेला आहे. तसेच विविध मासिके आणि संदर्भग्रंथाचा आधार घेण्यात आलेला असुन मिळालेल्या आकडेवारीच्या सहाय्याने सांख्यिकीय पध्दतीने विश्लेषण केलेले आहे.

**➢ विषय विवेचन :**

भारतातील अनुसुचित जमातीच्या लोकसंख्येचा आढावा घेण्यापुर्वी, अनुसुचित जमातीची व्याख्या व भारतातील वास्तव्यास असणाऱ्या जमातीची नावे थोडक्यात जाणुन घेऊ ते खालीलप्रमाणे —

**➢ अनुसुचित जमातीचा अर्थ :**

एकाकी, पर्वतात, डोंगराळ प्रदेशात, अरण्यात किंवा दुर्गम भागात जे मुळचे रहिवासी आहेत त्यांचा समावेश वेगवेगळया जमातीमध्ये होतोत्र ज्यांना आधुनिक संस्कृतीचा व जीवनाचा परिचय होऊ शकला नाही असे अल्पसंख्यांक आदिवासी समुदाय म्हणजे अनुसुचित जमाती/आदिवासी जमाती होय. अशा लोकांना

गिरिजन किंवा वन्यजमाती असे म्हणतात. हे लोक आर्थिक व सांस्कृतिकदृष्टया मागासलेले आहेत.

**१. डॉ. मुजमुदार :**

यांच्या मते आदिवासी समुदाय म्हणजे नातेदारीने संबंधित असलेल्या अनेक कुटुंबाचा समुदाय होय की ज्याला एक सामान्य नाम आणि समान भाषा असतो हा समुदाय एका विशिष्ट भुभागावर वसलेला असतो. तसेच या समुदायातील सभासद विविह व व्यवसाय बद्दल समान नियमांचे पालन करतात.

**२. भारतीय राज्यघटना :**

भारतीय राज्यघटनेच्या कलम ३४२ (१) नुसार राष्ट्रपतींनी घोषित केलेल्या जमातींना अनुसुचित जमाती असे म्हणतात. एकाकी, डोंगराळ, जंगलात राहणारे व ज्यांना आधुनिक संस्कृती व जीवनाचा परिचय होऊ शकला नाही अशा लोकांना गिरीजन किंवा आदिवासी असे म्हणतात.

यांचेमागासलेपण हे मुख्यत: आर्थिक व सांस्कृतिक आहे. इतर सर्व भारतीयांपेक्षा शैक्षणिक, आर्थिक व सांस्कृतीकदृष्टया मागासलेला समाज म्हणजे अनुसुचित जमाती होय.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतातील मागास जमातींच्या विकासासाठी घटना निर्मात्यांनी जमातीचा समावेश अनुसुचित जमाती या स्वरुपात करुन त्यांना आरक्षण व इतर सवलतींचा फायदा मिळवून दिला. सन २०११ सालच्या जनगणनेनुसार भारतातील अनुसुचित जमातीची एकुण लोकसंख्या १०४.१ दशलक्ष म्हणजेच एकुण लोकसंख्येच्या ८.६० टक्के एवढी होती. सन १९६१ च्या जनगणनेनुसार ३६५ अनुसुचित जमाती होत्या मात्र त्यांची संख्या गेल्या काही वर्षामध्ये वाढुन ती ४२५ पेक्षा जास्त अनुसुचित जमाती इतकी वाढली आहे.

➢ **भारतातील अस्तित्वात असलेल्या जमाती :**

भारतातील बहुतांश जमातीचे लोक दुर्गम डोंगराळ पर्वतीय व वनव्याप्त प्रदेशात वास्तव्यास आहेत. भारतात वास्तव्यास असणाऱ्या अनुसुचित जमाती या प्रदेशानुसार वेगवेगळया आहेत. त्या कोणत्या प्रदेशात कोणत्या जमाती वास्तव्यास आहेत ते खालीलप्रमाणे पाहता येते.

**१. उत्तर व ईशान्येकडील प्रदेश :**

पश्चिमेकडील भागात सिमला व लेह ही सीमेवरील ठाणी येतात तर पुर्वेकडील भागात लुशाई टेकडया व भिवूमी प्रदेश हा भाग येतो. हा प्रदेश शेवटाकडे रुंद होत असुन मध्यभागी थोडा अरुंद आहे. यामध्ये काश्मिर, लडाख, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड व ईशान्य भारत या भागात राहणाऱ्या जमाती येतात. सिक्कीमचा समावेशही याचा प्रदेशात होतो. या विभागात गुरुंमा, लिम्बु, लेपचा, आका, डफला, अबोर, मिरी, मिशमी सिंगफो, मिकिर, राभा, कचारी, गारो, खासी, नागा, कुकी, लुशाई, चकमा इत्यादी आदिवासी राहतात. हिमाचल प्रदेश, काश्मिर, लडाख इत्यादी पर्वतीय क्षेत्रात पशुचारक आदिम जमाती उदा. गद्दी, खस, गुज्जर, भाटिया थारु, इत्यादी आदिवासी वास्तव्य करतात.

**२. मध्य भारतातील प्रदेश :**

या विभागामध्ये पश्चिम बंगाल, झारखंड, उत्तरप्रदेशचा दक्षिण भाग. राजस्थानचा दक्षिण भाग, ओडिसा, महाराष्ट्राचा उत्तर भाग, मध्यप्रदेश, छत्तीसगड व ओडिशा हे प्रदेश येतात. हे प्रदेश लोकसंख्येच्यादृष्टीने व क्षेत्रफळाच्यादृष्टीने सर्वात मोठा आहे. या प्रदेशात संथाळ, मुण्डा, ओरांव किंवा उराव हो, भुमिज, खडिया, बिरहोर, भूडया, ज्वांग, कन्हा, साओरा, गोंड, बैगा, भिल्ल, कोळी इत्यादी प्रमुख आदिवासी जमाती राहतात.

**३. दक्षिणेकडील प्रदेश :**

यामध्ये आंध्रप्रदेश, कर्नाटक, तामिळनाडु, केरळ इ. राज्यांचा समावेश होतो. कृष्णा नदिच्या दक्षिणेच्या प्रदेशाचा यामध्ये समावेश होतो. चेंचू, कोटा, कुरुम्ब, बडगा, तोडा, काडर, मलयन, युथुवन, उरली, कणिकर इत्यादी आदिवासी राहतात. बंगालच्या उपसागरातील अंदमान व निकोबार बेटावर, जारवा, ओंग, उतारी, सेंटीनली, निकोबारी इत्यादी आदिवासी जमाती राहतात.

➢ **भारतातील आदिवासी जमातींचे राज्यानुसार वितरण (२०११ नुसार) :**

१. आदिवासी जमातीची सर्वाधिक लोकसंख्या असणारे राज्य/कें.प्र.

१) मध्यप्रदेश, २) महाराष्ट्र, ३) ओरिसा, ४) झारखंड, ५) गुजरात, ६) राजस्थान

२. आदिवासी जमातीची सर्वात कमी लोकसंख्या असलेले राज्ये/कं.प्र.

१) चंदिगड, २) गोवा, ३) दिल्ली, ४) हरियाणा, ५) पंजाब, ६) पॉडेचेरी, ७) उत्तरप्रदेश

३. भारतात आदिवासी जमातीची लोकसंख्येचे त्या राज्यातील एकुण लोकसंख्येतील प्रमाणानुसार सर्वाधिक असणारी राज्य/ केंद्रशासीत प्रदेश

| अ.क्र. | राज्याचे नाव | राज्याच्या ए. लोकसंख्येतील प्रमाण (टक्केवारी) |
|---|---|---|
| १ | लक्षद्विप | ९८.८ |
| २ | मिझोराम | ९४.४६ |
| ३ | नागालॅड | ८६.५ |
| ४ | मेघालय | ८६.१ |
| ५ | अरुणाचल प्रदेश | ६८.८ |
| ६ | दादरानगर हवेली | ५२ |
| ७ | मणिपुर | ४०.९ |
| ८ | त्रिपुरा | ३०.६ |
| ९ | ओरिसा | २२.८ |
| १० | सिक्कीम | ३३.८ |
| ११ | मध्यप्रदेश | २१.१ |
| १२ | गुजरात | १४.७६ |
| १३ | राजस्थान | १३.५ |
| १४ | बिहार | १.३ |

वरिल आकडेवारीचे विश्लेषण करता भारतात सर्वाधिक आदिवासी जमातीची लोकसंख्या मध्यप्रदेश राज्यात असुन त्यापाठोपाठ महाराष्ट्र, ओरिसा, झारखंड, गुजरात व राजस्थान या राज्यांचा क्रमांक लागतो, तर त्या त्या राज्यातील एकुण लोकसंख्येतील आदिवासी जमातीच्या शेकडा प्रमाणाचा विचार करता सर्वाधिक लोकसंख्या लक्षद्वित या केंद्रशासित प्रदेशाची असुन त्यापाठोपाठ मिझोराम, नागालॅड, मेघालय, अरुणाचलप्रदेश या राज्यांचा समावेश होतो. तर भारतातील आदिवासी जमातीची सर्वात कमी लोकसंख्या ही चंदिगढ या केंद्रशासित प्रदेशाची असुन त्यापाठोपाठ गोवा, दिल्ली, हरियाणा, पंजाब, पॉडिचेरी आणि उत्तरप्रदेश या राज्यांचा क्रमांक लागतो.

## ➢ निष्कर्ष :

भारतात विविध प्रकारच्या आदिवासी जमातीचे वास्तव्य वेगवेगळया प्रदेशात असलेले दिसुन येत असले तरी सध्या अनेक आदिवासींच्या मुळ भाषा आणि सांस्कृतिक ठेवा लुप्त होत चाचला आहे तो ठेवा लुप्त होऊ नये म्हणुन या जमातींची मुळ स्वरुपातील भाषा, सांस्कृती आणि सामाजिक वैविध्य जतन करुन ठेवणे आवश्यक आहे. ज्याद्वारे भारतातील विविधतेतील एकता टिकवली जाईल. भारतातील आदिवासी जमातींचा सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासासाठी सरकारांद्वारे राबवल्या जाणाऱ्या अनेक योजनांची योग्य प्रकारे आंमलबजावणी केली पाहीजे. जेणेकरुन आदिम जमातीच्या विकासाबरोबरच त्यांचा सांस्कृतीक ठेवा जपुन राहील.

## संदर्भ ग्रंथ

1) मानवी भूगोल - डॉ.विठ्ठल घारपुरे
2) भारतीय जनगणना अहवाल 2011
3) भारताचा भूगोल - ए .बी .सवदी
4) मानवी भूगोल - डॉ सोनुले आणि पाटील